CMYK




दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 86 ■ रविवार, दि. 03 नोव्हेंबर 2024 ■ पाने 8 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# लाडक्या बहिणींना मुख्यमंत्र्यांचं सरप्राईज, डिसेंबरच्या हप्त्याबाबत मोठी बातमी!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :गरीब महिलांना आर्थिक मदत व्हावी यासाठी राज्यात लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. निवडणुकीपूर्वी सादर करण्यात आलेल्या अंतरीम अर्थसंकल्पामध्ये लाडकी बहीण या योजनेची घोषणा करण्यात आली.

या योजनेंतर्गत राज्यातील लाभार्थी महिलांच्या खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा केले जातात. निवडणुकीची आचारसंहित लागण्यापूर्वीच ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे पैसे महिलांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आले होते. मात्र आता जी चर्चा आहे ती म्हणजे डिसेंबरचे पैसे लाडक्या बहिणींच्या खात्यात कधी जमा होणार. यावर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



**नेमकं काय म्हणाले एकनाथ शिंदे?**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींना पाडव्याच्या मुहूर्तावर आनंदाची बातमी दिली आहे. आचारसंहिता सुरु आहे. लाडक्या बहिणींना आपण दर महिन्याला जे पैसे देतो ते आचारसंहितेमध्ये अडकू नये यासाठी ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे पैसे आधीच त्यांच्या खात्यामध्ये जमा केले होते. आता वीस नोव्हेंबरला विधानसभेची निवडणूक आहे, तेवीस नोव्हेंबरला मतमोजणी होईल. त्यानंतर याच नोव्हेंबर महिन्यात आम्ही लाडक्या बहिणींच्या खात्यात डिसेंबरचा हफ्ता जमा करणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

आमचा हेतू स्पष्ट आहे, आम्ही घेणारे नाही तर देणारे लोक आहोत असं म्हणत त्यांनी यावेळी विरोधकांनाही टोला लगावला.


पुढे बोलताना त्यांनी याच योजनेवरून विरोधकांवर देखील जोरदार टीका केली. लाडक्या बहिणी यांना कधीही माफ करणार नाहीत. लाडकी बहीण योजनेत विरोधकांनी आडथळा आणला, ज्यांनी आडथळा आणला त्यांना लाडक्या बहिणी जोडे दाखवतील.आम्ही केवळ १५०० रुपयांवरच थांबणार नाहीत तर जर आम्हाला पुन्हा आशीर्वाद मिळाला तर आम्ही ही रक्कम वाढवणार आहोत.लाडक्या बहिणींना लखपती करण्याचं आमचं स्वप्न असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील ही योजना सुरूच राहणार असल्याचं म्हटलं होतं. मी अर्थमंत्री आहे, या योजनेसाठी पुढील पाच वर्षांची तरतूद करून ठेवली आहे. जर पुन्हा अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळाली तर पुढील अर्थसंकल्प हा सात हजार कोटींचा असेल त्यात लाडक्या बहिणींसाठी ४५ हजार कोटींची तरतूद असेल असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.



# बुलढाण्यात आठ नोव्हेंबरला उद्धव ठाकरे यांची सभा !

## कार्यकर्ता हाच उद्याचा आमदार असेल : जयश्रीताई शेळके



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : महाविकास आघाडीचे उमेदवार जयश्रीताई शेळके यांच्या प्रचारासाठी शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची ८ नोव्हेंबर रोजी भव्य सभा बुलढाणा येथे आयोजित करण्यात आली आहे. यामुळे शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य संचारले आहे. जयश्रीताई शेळके यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन आज टिळक नाट्य क्रीडा मंदिर, विश्राम भवन जवळ करण्यात आले. यावेळी ही माहिती देण्यात आली. यावेळी बोलताना जयश्रीताई म्हणाल्या... उमेदवाराने प्रत्येक कार्यकर्त्यापर्यंत पोहोचले पाहिजे अशी अपेक्षा असते. ही अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र कार्यकर्त्यां स्वतःच उमेदवार आणि उद्याचा आमदार आहे. याची हमी देते. असे समजून कामाला लागा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी महाविकास आघाडीच्या नेत्यांची उपस्थिती एकजुटीचे दर्शन घडवणारी ठरली. महाविकास आघाडीचे नेते व कार्यकर्त्यांच्या वज्रमुठी मुळे विजयाचा मार्ग सुकर झाला आहे. विजय आपलाच असल्याचे जयश्रीताई शेळके म्हणाल्या.यावेळीआमदार धीरज लिंगाडे,संपर्कप्रमुख नरूभाऊ खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, नरेश शेळके, एडवोकेट गणेश पाटील, सुनील सपकाळ, संदीप दादा शेळके,शरद काळे, सईद सेठ, कदीरुद्दीन ,आशिष बाबा खरात, सत्तार कुरेशी, विनोद बेडवाल, बाजार समितीचे संचालक खरे, यशवंत धाबे, लखन गाडेकर, बीटी जाधव, पीएम जाधव ,पिंपरकर साहेब, एडवोकेट गणेश सिंग राजपूत, हेमंत खेडेकर, अनिल बावस्कर, मनोज चंदन, सुनील घाटे ,गजानन मामलकर ,शिवाजी गवई ,सुजित देशमुख, महाविकास आघाडीचे तालुका, शहराध्यक्ष आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



### जयश्रीताईंमुळे वन साईड फाईट - नरेंद्र खेडेकर

जयश्रीताई शेळके यांचे नाव जाहीर होताच विरोधी पक्षाच्याची हवा टाईट झाली असून आता वनसाईड फाईट होणार असे प्रतिपादन शिवसेना संपर्कप्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर यांनी यावेळी केले. खेडेकर पुढे म्हणाले, खऱ्या अर्थाने ही लढाई प्रतिष्ठेची आहे. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यानी बुलडाणा विधानसभेच्या बूथवर परिश्रम घ्यावे. जास्तीत जास्त मते महाविकास आघाडीच्या उमेदवार जयश्रीताई शेळके यांना मिळवून द्या, असे आवाहन त्यांनी केले.

### भयमुक्त व्हा - आ. लिंगाडे

धीरज लिंगाडे यांनी सांगितले की, बुलडाणा विधानसभा मतदारसंघात दहशतीचे वातावरण आहे. कोणालाही बोलण्याचा अधिकार नाही. मात्र या प्रकाराला न जुमानता जयश्रीताई शेळके यांच्या पाठीशी उभे राहून आपणास विजयाचा झेंडा फडकवायचा आहे असे सांगितले. संचलन कॉंग्रेसचे नेते सुनील सपकाळ यांनी केले.

### ताईच्या पाठीशी अनेक भाऊ : बुधवत

उबाठाचे जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत म्हणाले की, ताई तुमचे भाऊ खूप मेहनतीने काम करीत आहे. यावेळी आम्ही तुम्हाला आमदार म्हणून विधानसभेत पाठविणार आहे. तुमच्या हातून बुलढाण्याचा विकास होतांना आम्हाला पाहायचा आहे.

# बेपत्ता असलेल्या आठ महिलांचा विशेष मोहिमेअंतर्गत शोध; जानेफळ पोलीस स्टेशनची कामगिरी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : सन २०१५ पासून पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गावांमधील बेपत्ता असलेल्या ८ महिलांचा विशेष मोहीमे अंतर्गत शोध जानेफळ पोलीस स्टेशनच्या पथकाने लावला आहे.



बुलढाणा पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे यांच्या सुचनेवरुन दि.१७ ते ३१ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यामध्ये बेपत्ता असलेल्या महिला व बालके यांची प्रभावी शोध मोहीम राबवुन प्रत्येक पोलीस स्टेशनच्या अभिलेखावरील मिसींग महिला व बालकांचा जास्तीत जास्त प्रमाणात शोध घेण्याचे आदेशीत केले होते. त्यानुसार जानेफळ पोलीस स्टेशन येथे बेपत्ता महिला व बालकांचा शोध घेण्या करिता पथक स्थापन करून दि.१७ ते ३१ ऑक्टोबर २०२४ या १४ दिवसांच्या कालावधीत जानेफळ पोलीस स्टेशनच्या पथकाने पोलीस स्टेशन हद्दीतील सन २०१५ पासून बेपत्ता असलेल्या ८ महिलांचा शोध लावला असून सदर महिला नातेवाइक तसेच परिजन यांचे सहवासात सुस्थितीत असल्याचे आढळुन आले. यामध्ये देऊळगाव साकर्शा येथील १, कळंबेश्र्वर येथील १, उटी येथील १, नायगाव देशमुख येथील २, जानेफळ येथील १, बारडा येथील १, घुटी येथील १ महिलेचा यामध्ये समावेश आहे. बेपत्ता महिलांचा शोध घेण्यासाठी देऊळगाव साकर्शा येथील पोलीस पाटील गजानन पाचपोर, बारडा येथील पोलीस पाटील बार्डेकर , उटी येथील पोलीस पाटील किशोर आंधळे, नायगाव देशमुख येथील होमगार्ड चरण राठोड, कळंबेश्र्वर येथील पोलीस पाटील नंदा गायकवाड, गुटी येथील होमगार्ड राहुल सरदार यांनी मदत केली. ही कामगिरी बुलढाणा पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अजिनाथ मोरे, पोलीस अंमलदार विनोद फुपाटे, सुशिल कटारे. पोलीस अंमलदार निता शिंदे, शिवकन्या खोलगडे यांनी केली. पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे हे महिला, ज्येष्ठ नागरीक तसेच लहान मुले यांची सुरक्षा व काळजी या बद्दल अतिशय संवेदनशील असून या घटकाच्या सुरक्षिततेसाठी पोलीस अधीक्षक यांचे जिल्ह्यांतील सर्व ठाणेदारांना योग्य मार्गदर्शन नियमित केले जाते.

# ग्राहकांसोबत व्यवसायाबरोबरच स्नेहाचे नाते : संस्थेचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण

## डोणगांव अर्बनचा तिसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : डोणगाव अर्बन बँकेने व्यवसाय करताना सामाजिक कार्यही भरभरून करण्यास प्राधान्य दिले आहे. त्यामुळे ग्राहकांसोबत एक स्नेहाचे नाते नर्माण झाले आहे. ग्राहकांच्या उस्फूर्त प्रतिसादाने व बँकेच्या विश्र्वासाने छोटेसे लावलेल्या या रोपट्याचे आता वृक्षात रूपांतर झाले आहे. बँकेने व्यवसायाबरोबरच ग्राहकांसोबत एक स्नेहाचे नात्याचे जाळे निर्माण केले आहे. असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण यांनी केले.ते डोणगाव अर्बन बँकेच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ज्ञानेश्र्वर टाले हे होते.तर, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण, केशवराव वानखेडे, सुबोध आखाडे, विनोद खंडारे, हेमराज शर्मा, शे. सोहेल, रामेश्र्वर पळसकर, गजानन हुले, इमरान खान, संस्थेचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण, देवेंद्र आखाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करताना डोणगाव अर्बन बँकेने व्यवसायाबरोबर ग्राहकांशी एक स्नेहाचे नाते निर्माण केले आहे. संस्थेचे सामाजिक कार्य ही भरभरून आहे. संस्थेचे कर्मचारी अर्बन बँकेच्या परिवारातील एक सदस्य म्हणून कामाला प्राधान्य देतात. त्यामुळेच हे ईवलेसे रोपट आता मोठा आकार घेत आहे. असे मत संस्थेचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण यांनी व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ . ज्ञानेश्र्वर टाले यांनी अगदी सर्व सामान्य कुटुंबातील तरुणाने डोणगाव अर्बन बँक सुरू करून स्वतः बरोबर समाजातील घटकांची उन्नती करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ही बाब सोपी नाही. खुप मेहनतीने लावलेल्या रोपट्याची निगा घेतल्याने डोणगांव अर्बन बँकेचा परिवार मोठा झालेला दिसत आहे. डोणगांव अर्बन बँक फक्त व्यवसायच करत नाही तर सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असते. बँकेने समाजामध्ये एक विश्र्वास निर्माण केला आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना डोणगांव अर्बन संस्थेचा तिसरा वर्धापन दिन हा फक्त संचालक मंडळ व कर्मचारी यांच्या साठीच आनंदाचा क्षण नसून परिसरातील ग्राहक व नागरिकांचा ही आनंदाचा क्षण आहे. म्हणून ऋषांक चव्हाण हे डोणगांव अर्बनचे अध्यक्ष असले तरीही मातीशी व मानसाशी जुळलेले असल्याचे मत व्यक्त करून बँकेच्या प्रगतीबाबत आनंद व्यक्त केला. यावेळी संस्थेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन हमीद मुल्लाजी यांनी केले .तर आभार प्रदर्शन शे. सलमान यांनी मानले.







### उत्कृष्ट कार्याबद्दल बँक मॅनेजर व कर्मचाऱ्यांचा सत्कार

डोणगांव अर्बन चे कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवेबद्दल डोणगाव अर्बन बँकेचे मॅनेजर समीर यांचा विशेष सत्कार संस्था अध्यक्ष यांच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच बँकेच्या इतर कर्मचाऱ्यांचा सुद्धा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार यावेळी करण्यात आला.

CMYK

## प्रदूषणाचा भस्मासुर रोखा

देशाची राजधानी असलेली दिल्ली आता प्रदूषणाचीही राजधानी बनली आहे. दिल्लीतील प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली आहे. रविवारी राजधानी दिल्लीतील हवेचा दर्जा निर्देशांक ( ए क्यू आय ) ४०० हून अधिक नोंदवला गेला त्यामुळे दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर बनले आहे. अर्थात ही काय भूषणावह बाब नाही उलट यामुळे देशाची मान खाली झुकली आहे अर्थात त्यात आश्र्चर्य वाटण्यासारखे काही नाही दिल्लीतील प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाय करा असा अनेक सामाजिक व सेवाभावी संघटनेने सरकारला इशारा दिला होता मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. केवळ दिल्लीतच नाही तर दिल्लीसह देशातील अकरा शहरांची ए क्यू आर म्हणजे हवेची गुणवत्ता ३०० च्या वर नोंदवली गेली. मुंबई शहरातील हवेची गुणवत्ता देखील खालावली असून मुंबई शहरावर धुक्याची चादर पसरली असून आग्र्याचा ताजमहालालाही प्रदूषणामुळे धोका निर्माण झाला आहे. मागील वर्षी स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल प्रसिद्ध केला होता. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक होता कारण या अहवालात भारत जगातील आठव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून दिल्ली जगातील चौथ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर असल्याचे नमूद करण्यात आले होते व त्याच अहवालात प्रदूषित शहरांच्या यादीत चौथ्या क्रमांकावर असलेली दिल्ली लवकरच पहिल्या क्रमांकावर पोहचेल असा इशाराही दिला होता. अवघ्या वर्षभरात त्यांचा इशारा खरा ठरला. स्विस संस्थेने तयार केलेल्या या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम – २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३१ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली होती. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम – २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले आहे. आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची किती वाईट अवस्था झाली आहे हे आपण पाहत आहोतच. मागील वर्षी प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली आली होती. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई – दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम – विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

# भाऊबीजचे इतिहास आणि महत्त्व



भाई म्हणजे भाऊ आणि दूज म्हणजे अमावास्येनंतरचा दुसरा दिवस. या दिवशी लोक आपल्या भावंडांसोबत साजरे करतात.

भाऊ आणि बहिणीमध्ये सामायिक केलेले बिनशर्त प्रेम साजरे करायचे आहे. दरवर्षी, पाच दिवसांच्या दिवाळी उत्सवाच्या शेवटच्या दिवशी भाऊबीज साजरा केले जाते. दिवाळी दरवर्षी मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. दिव्यांचा सण धनत्रयोदशीपासून सुरू होतो. दिवाळीच्या एक दिवस आधी छोटी दिवाळी साजरी केली जाते. यंदा मात्र, दिवाळीबरोबरच छोटी दिवाळी एकाच दिवशी येते. दिवाळीनंतर एक दिवस गोवर्धन पूजा साजरी केली जाते. दिवाळी सणाच्या पाचव्या दिवशी भाई दूज साजरा केला जातो. आपण सण साजरा करण्यासाठी तयारी करत असताना, येथे काही तथ्ये आहेत जी आपल्याला माहित असणे आवश्यक आहे.

यावर्षी ०३ नोव्हेंबरला भाऊबीज साजरी होणार आहे. हा दिवस भावंडांमधील भाऊ आणि बहीण यांच्यातील बिनशर्त प्रेमाचा उत्सव साजरा करतो.

हिंदू पौराणिक कथेनुसार, नरकासुराचा पराभव केल्यानंतर भगवान कृष्णाने आपली बहीण सुभद्राला भेट दिली. सुभद्राने मिठाई आणि फुले देऊन त्यांचे स्वागत केले आणि कपाळावर तिलक लावला. तेव्हापासून हा दिवस भाईदूज साजरा केला जातो. दुसर्या कथेनुसार, मृत्यूचा देव यम त्याची बहीण यमुना हिला भेटला आणि तिलक समारंभाने त्याचे स्वागत केले. तेव्हा यमाने ठरवले की या दिवशी जो कोणी आपल्या बहिणीकडून तिलक आणि मिठाई घेईल त्याला दीर्घायुष्य लाभेल.

भाई म्हणजे भाऊ आणि दूज म्हणजे अमावास्येनंतरचा दुसरा दिवस. या दिवशी लोक आपल्या भावंडांसोबत साजरे करतात. ते एकमेकांना भेटवस्तूंची देवाणघेवाण करतात आणि एकमेकांवर खूप प्रेम करतात. हा सोहळा आपल्याला सर्व प्रकारच्या वाईट शक्तींपासून वाचवण्यासाठी आणि आपल्याला समृद्धी आणि दीर्घायुष्य प्रदान करण्यासाठी होतो. पश्र्चिम बंगालमध्ये भाई दूज हा भाई फोटा म्हणून साजरा केला जातो. दक्षिण भारतात, यम द्वितीया पाळली जाते, तर महाराष्ट्र त्याच दिवशी भाऊ बीज पाळतो.

## कोणीही मतदानापासून वंचित राहू नयेत याकरिता यावर्षीचा साखर गळीत हंगाम हा २१ नोव्हेंबरनंतर सुरु करावा – सदाभाऊ खोत

**सांगली/प्रतिनिधी** :राज्यातील साखर कारखान्यांचा २०२४–२५ चा गळीत हंगामाला १५ नोव्हेंबरपासून प्रारंभ होणार आहे. त्यासाठी विदर्भ, मराठवाड्यासह राज्यभरातील ऊसतोड मजुरांच्या टोळ्या राज्यभरात गावोगावी दाखल होऊ लागल्या आहेत. परंतु आपल्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. निवडणुकीच मतदान २० नोव्हेंबरला आहे. त्यामुळे साखर कारखान्याचा गळीत हंगाम १५ नोव्हेंबरला चालू केल्यास ऊस तोडणी कामगार व संबंधित इतर लोक हे मतदानापासून वंचित राहतील. त्यामुळे वरील बाबीच्या गांभीर्याने विचार करून कोणीही मतदानापासून वंचित राहणार नाही, याकरिता या वर्षीच्या गळीत हंगाम हा २१ नोव्हेंबर नंतर सुरू करणेबाबतचा सुधारित अध्यादेश काढावा, अशी मागणी रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी राज्याचे साखर आयुक्त यांच्याकडे केली आहे.



# राज्यातील ४७ मतदारसंघात मशाल : धनुष्यबाणाचा सामना!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदा शिवसेना विरुद्ध शिवसेना असा थेट सामना अनेक मतदारसंघात पाहायला मिळणार आहे. राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघ पैकी ४७ विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेना विरुद्ध शिवसेना असा संघर्ष पाहायला मिळणार आहे.

एकनाथ शिंदे यांच्यासह समर्थक आमदार खासदारांनी शिवसेनेत बंडखोरी केली. त्यानंतर शिवसेना शिंदे सेना आणि ठाकरे सेना असे दोन गट पडले. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीत देखील हे दोन्ही गट आमने सामने दिसून येत आहे. दरम्यान महाराष्ट्रातील ४७ विधानसभा मतदारसंघात शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना होत आहे.


या मतदारसंघात होणार थेट लढत

चोपडा : प्रा. चंद्रकांत सोनवणे (सेना), प्रभाकर सोनवणे (उबाठा),

बुलढाणा :संजय गायकवाड (सेना), जयश्री शेळके (उबाठा),

मेहकर : संजय रायमुलकर (सेना), सिद्धार्थ खरात (उबाठा),

बाळापूर : बळीराम शिरसकर (सेना), नितीन देशमुख (उबाठा),





रामटेक : आशिष जैस्वाल (सेना), विशाल बरबटे (उबाठा),

कळमनुरी :संतोष बांगर (सेना), संतोष टारफे (उबाठा),

परभणी :आनंद भरोसे (सेना), राहुल पाटील (उबाठा),

सिल्लोड :अब्दुल सत्तार (सेना), सुरेश बनकर (उबाठा),

कन्नड :संजना जाधव (सेना), उदयसिंह राजपूत (उबाठा),

औरंगाबाद पश्र्चिम :संजय शिरसाट (सेना), राजू शिंदे (उबाठा),

पैठण :विलास भुमरे (सेना), दत्ता गोर्डे (उबाठा),

वैजापूर :रमेश बोरनारे (सेना), दिनेश परदेशी (उबाठा),

नांदगाव :सुहास कांदे (सेना), गणेश धात्रक (उबाठा),

पालघर :राजेंद्र गावित (सेना), जयेंद्र दुबळा (उबाठा),

बोईसर :विलास तरे (सेना), विश्र्वास वळवी (उबाठा),

भिवंडी ग्रामीण :शांताराम मोरे (सेना), महादेव घाटळ (उबाठा),

कल्याण पश्र्चिम :विश्र्वनाथ भोईर (सेना), सचिन बासरे (उबाठा),

अंबरनाथ :बालाजी किणीकर (सेना), राजेश वानखेडे (उबाठा),

कल्याण ग्रामीण :राजेश मोरे (सेना), सुभाष भोईर (उबाठा),

ओवळा :माजीवडा : प्रताप सरनाईक (सेना), नरेश मणेरा (उबाठा),

कोपरी :पाचपाखाडी : एकनाथ शिंदे (सेना), केदार दिघे (उबाठा),

मागाठणे :प्रकाश सुर्वे (सेना), उदेश पाटेकर (उबाठा),

विक्रोळी :सुवर्णा करंजे (सेना), सुनील राऊत (उबाठा),

भांडुप पश्र्चिम :अशोक धर्मराज पाटील (सेना), रमेश कोरगावकर (उबाठा),

जोगेश्वरी पूर्व :मनिषा वायकर (सेना), अनंत (बाळा) नर (उबाठा),

दिंडोशी :संजय निरुपम (सेना), सुनील प्रभू (उबाठा),

अंधेरी पूर्व :मूरजी पटेल (सेना), ऋतुजा लटके (उबाठा),

चेंबुर :तुकाराम काते (सेना), प्रकाश फातर्पेकर (उबाठा),

कुर्ला :मंगेश कुडाळकर (सेना), प्रविणा मोरजकर (उबाठा),

माहिम :सदा सरवणकर (सेना), महेश सावंत (उबाठा),

वरळी :मिलिंद देवरा (सेना), आदित्य ठाकरे (उबाठा),

भायखळा :यामिनी जाधव (सेना), मनोज जामसुतकर (उबाठा),

कर्जत :महेंद्र थोरवे (सेना), नितीन सावंत (उबाठा),

महाड :भरतशेठ गोगावले (सेना), स्नेहल जगताप (उबाठा),

नेवासा :विठ्ठलराव लंघे पाटील (सेना), शंकरराव गडाख (उबाठा),

उस्मानाबाद :अजित पिंगळे (सेना), कैलास पाटील (उबाठा),

परांडा :तानाजी सावंत (सेना), राहुल ज्ञानेश्वर पाटील (उबाठा),

बार्शी :राजेंद्र राऊत (सेना), दिलीप सोपल (उबाठा),

सांगोला :शहाजी बापू पाटील (सेना), दीपक आबा साळुंखे (उबाठा),

पाटण :शंभूराज देसाई (सेना), हर्षद कदम (उबाठा),

दापोली :योगेश कदम (सेना), संजय कदम (उबाठा),

गुहागर : राजेश बेंडल (सेना), भास्कर जाधव (उबाठा),

रत्नागिरी :उदय सामंत (सेना), सुरेंद्रनाथ (बाळ) माने (उबाठा),

राजापूर :किरण सामंत (सेना), राजन साळवी (उबाठा),

कुडाळ :नीलेश राणे (सेना), वैभव नाईक (उबाठा),

सावंतवाडी :दीपक केसरकर (सेना), राजन तेली (उबाठा),

राधानगरी :प्रकाश आबिटकर (सेना), के. पी. पाटील (उबाठा).

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# डॉ. ऋतुजा चव्हाणसाठी तृतीयपंथी प्रचाराच्या मैदानात

## डॉ. ऋतुजाताईंनांना दिले भरभरून आशीर्वाद

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातील वंचितचा उमेदवार डॉ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांना तृतीयपंथीयांनी मेहकर येथे येऊन आशीर्वाद देत तुम्हीच या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणार असा विश्र्वास व्यक्त केला व आम्ही तुमच्या प्रचारासाठी विधानसभा मतदारसंघात प्रचार करणार असल्याची ग्वाही सुद्धा तृतीय पंथीयांनी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.सौ. ऋतुजा चव्हाण यांना दिली.

यावेळी तृतीयपंथीयांनी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.ऋतुजा चव्हाण यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला,तर यावेळी डॉ.चव्हाण यांच्याकडून सुद्धा त्यांचा यथोचित सत्कार करून सन्मान केला. तृतीयपंथयांना आता निवडणुकी संदर्भात विशेष अधिकार मिळालेले आहे. त्यामुळे त्यांची नोंद घेत त्यांना मतदानाचा अधिकार बहाल केला आहे. तृतीयपंथींच्या महाराष्ट्रात अनेक संघटना सुद्धा कार्यरत आहेत. तृतीयपंथी हे भटकंती करून आपले जीवन जगत असले तरी त्यांना सन्मानाची वागणूक ही मिळत आहे. आता तर तृतीयपंथी यांच्या विविध संघटना कार्यरत असल्याने त्यांचे राजकीय वजनही वाढत चालल आहे. संपूर्ण महाराष्ट्रात प्रचंड संख्येने असलेल्या या तृतीयपथी यांना आता विविध राजकीय पक्षात पदाधिकारी म्हणूनही प्रतिनिधित्व मिळत आहे. यावेळेस तर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रावेर मतदार संघात शमीबा पाटील या तृतीयपंथीला उमेदवारी सुद्धा वंचित बहुजन आघडीकडून देण्यात आली आहे. तर दिशा पिंकी शेख हे तृतीयपंथी वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश प्रवक्ता म्हणूनही आपला कार्यभार सांभाळत आहेत.

तृतीयपंथीयांना आता राजकारणात सन्मान मिळत असल्याबरोबरच वंचितने रावेर मतदार संघात एका तृतीय पंथीला उमेदवारी दिल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील तृतीयपंथी यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तर तृतीयपंथी विविध संघटनांच्या वतीने महाराष्ट्रातील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे. त्याचबरोबर तृतीयपंथीयांच्या विविध संघटना या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारासाठी प्रचाराच्या मैदानात सुद्धा उतरणार आहेत.

वंचित बहुजन आघाडीच्या मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात विधानसभेची निवडणूक लढवित असलेल्या डॉ.सौ. ऋतुजा चव्हाण यांच्या प्रचारासाठी या परिसरातील तृतीयपथीयांनी डॉ. ऋतुजा चव्हाण यांची भेट घेऊन त्यांना तुम्हीच विजयी होणार असा आशीर्वाद दिला आहे. तर तुमच्या प्रचारासाठी आम्ही पूर्णवेळ मतदारसंघात राहून प्रचार सुद्धा करणार असल्याचे आश्वासन यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ. ऋतुजा चव्हाण यांना दिले आहे. तर यावेळी ऋतुजा चव्हाण यांच्याकडून या तृतीय यांचा येथोचित सत्कार करून त्यांचा सन्मान सुद्धा केला आहे. एरवी दृष्ट नजरेने तृतीयपंथीयांकडे पाहिले जात होते. मात्र आता त्यांना मतदानाचा अधिकार व राजकारणात सन्मान मिळत असल्याने त्यांच्या चेहऱ्यावरही स्मितहास्य फुलले जात आहे. राजकारणातील या प्रवेशाने तृतीय पंथीयांचे राजकीय दृष्ट्या वजन सुद्धा वाढले असल्याचे चर्चा होत आहे.

## ठळक...

### जुन्या चेहऱ्यांना जनता वैतागली आहे- प्रशांत डिक्कर



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघातील त्याच त्या चेहऱ्यांना आता मतदार वैतागले असून सर्वसामान्यांचा चेहरा म्हणून माझ्याकडे पाहिल्या जात आहे. शेतकऱ्यांसह दिन दलितांचे दुःख दूर करून शेतमालाला भाव आणि मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जनता मलाच निवडून देईल असा विश्र्वास जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे तिसऱ्या आघाडीचे उमेदवार प्रशांत डिक्कर यांनी व्यक्त केला आहे.

### भोकर मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची ८ नोव्हेंबरला प्रथम तपासणी

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ८५-भोकर मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी शुक्रवार ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ यावेळेत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय उपविभागीय अधिकारी कार्यालय सभागृह भोकर येथे केली जाणार आहे. या तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षक यांच्यासमोर सादर करणे आवश्यक आहे.



अनुपस्थित राहणारे उमेदवार भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकांनुसार कार्यवाहीस पात्र असतील. तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवणे व दाखल करण्याच्या कायद्याच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने कसूर केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १० क अन्वये तो निवडणूक आयोगाकडून तीन वर्षाच्या कालावधीसाठी निरर्ह ठरविण्यास पात्र असेल याची नोंद घ्यावी.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम , १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार एकतर तो स्वत: ,ती स्वत: किंवा त्याच्या, तिच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे त्याला, तीला नामनिर्देशित करण्यात आले आहे. त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागण्याच्या दिनांकापर्यत दोन्ही दिनांक धरुन, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे, असे निवडणूक निर्णय अधिकारी ८५-भोकर विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रविण मेगशेट्टी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## पक्षप्रमुख उद्धव ठाकरे दोन दिवस पश्चिम विदर्भ दौऱ्यावर, प्रचाराचा उडणार धुरळा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : शिवसेना वसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ७ व ८ नोव्हेंबर दोन दिवस शिवसेना(उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ पश्चिम विदर्भ दौऱ्यावर येणार आहेत. बुलढाणा येथे ८ नोव्हेंबर रोजी जयश्री शेळके यांच्या प्रचारार्थ दुपारी तीन वाजता तर मेहकर चे उमेदवार सिध्दार्थ खरात यांच्या प्रचारार्थ सायंकाळी पाच वाजता सभा आयोजित केल्या आहेत.



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ५ नोव्हेंबर रोजी प्रचाराचा शुभारंभ कोल्हापूरच्या अंबाबाईच्या दर्शन घेऊन करतील. पश्चिम विदर्भात शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी ७ व ८ नोव्हेंबर दोन दिवस प्रचाराचा झंझावात राहणार असून ७ नोव्हेंबर दुपारी १ वाजता दर्यापूर विधानसभा, तीन वाजता तिवसा विधानसभा, सायंकाळी ४ वाजता बडनेरा विधानसभा तर सायंकाळी ७ वाजता नितीन देशमुख यांच्या प्रचारार्थ सभा होणार आहे.

८ नोव्हेंबरला पक्षप्रमुख उद्धव ठाकरे बुलढाणा जिल्ह्यात दोन सभा घेतील. बुलढाण्यात सभा ८ नोव्हेंबर दुपारी तीन वाजता तर मेहकरची सभा सायंकाळी पाच वाजता होणार आहे. विश्वसनीय सुत्रांची माहिती.

### राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी रावसाहेब दानवेंवर केली जोरदार टीका



**अकोला/प्रतिनिधी** : भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी अब्दुल सत्तारांवर टीका करताना स्वतःची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांची केली होती. यावरून राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी रावसाहेब दानवेंवर जोरदार टीका केली आहे. यावरून आमदार मिटकरींनी रावसाहेब दानवेंची अक्कल काढली आहे. महाराजांचा एकेरी उल्लेख सुद्धा केल्याच दानवेंनी म्हटलय. दानवेंनी स्वतःची शिवाजी महाराजांची तुलना करताना आपलं तोंड आरशात पहावं, महाराजांच्या मावळ्यांच्या टापाखालच्या मातीच सुद्धा तुमचं तोंड बरोबरी करतय का हे एकदा बघितल पाहिजे, असा टोला आमदार मिटकरींनी दानवेंना लगावला. मी एक शिवप्रेमी म्हणून या विधानाचा जाहीर निषेध करतो त्यांनी तत्काळ महाराष्ट्राची माफी मागावी अन्यथा महाराष्ट्रातील शिवप्रेमी त्यांचे राजकारण इतिहासात जमा करून टाकतील असे देखील मिटकरींनी कठोर शब्दात सुनावले आहे. तर या विधानावर देवेंद्र फडणवीस फडणवीस यांनी तात्काळ दानवे यांना महाराष्ट्राची माफी मागायला लावावी, अशी मागणी देखील मिटकरींनी केली आहे.

### निवडणूक खर्चासाठी उमेदवाराचे स्वतंत्र बँक खाते आवश्यक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता भारत निवडणूक आयोग यांनी खर्चविषयक सूचना सारसंग्रह २०२४ मध्ये निर्देश दिल्यानुसार उमेदवारांनी आपल्या निवडणूक खर्चाकरिता स्वतंत्र बँक खाते उघडून त्यातूनच व्यवहार करणे आवश्यक आहे.

उमेदवारांने निवडणूक खर्चासाठी असलेली संपूर्ण रक्कम संबंधित बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. निवडणुकीसाठी उघडलेल्या बँक खात्यातून उमेदवाराने आपला निवडणूक खर्च धनादेश, धनाकर्ष, आरटीजीएस, एनईएफटीद्वारे करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी आपल्या विरोधात कोणतेही गुन्हे दाखल असल्याची, नसल्याबाबतची जाहिरात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. जाहिरातीचा खर्च निवडणूक खर्चाचीबाब म्हणून गणली जाईल.

### मुंबई शहर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या दैनंदिन खर्च हिशोब तपासणीसाठी वेळापत्रक जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्च तपासणीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. उमेदवार, प्रतिनिधींनी वेळापत्रकानुसार विहित दिवशी व वेळेला उपस्थित राहण्याचे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी केले आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील धारावी, सायन कोळीवाडा, वडाळा, माहिम, वरळी या पाच विधानसभा मतदारसंघासाठी केंद्रीय खर्च निरीक्षक विजय बाबू वसंता तर शिवडी, भायखळा, मलबार हिल, मुंबादेवी, कुलाबा या पाच विधानसभा मतदारसंघासाठी केंद्रीय खर्च निरीक्षक म्हणून अमन प्रित काम पाहत आहेत.

विधानसभा मतदारसंघाच्या खर्च निरीक्षकांनी उमेदवारांचा खर्च तपासणीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

खर्च तपासणीसाठी तारीख :-

१) गुरुवार दि. ७ नोव्हेंबर २०२४

२) बुधवार दि. १३ नोव्हेंबर २०२४

३) सोमवार दि.१८ नोव्हेंबर २०२४

तपासणीचे ठिकाण :- सह्याद्री अतिथीगृह तळमजला बैठक कक्ष मलबार हिल, मुंबई.

तपासणीची वेळ :- सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत होईल.

उमेदवार, प्रतिनिधींनी सर्व प्रकारच्या नोंदवह्या जसे की, दैनंदिन खर्च नोंदवही, रोख नोंदवही, बँक नोंदवही, संबंधित प्रमाणके, देयके (खर्चाच्या पावत्या), बँक पासबुक व इतर सर्व मूळ कागदपत्रांसह वरील नमूद ठिकाणी व दिनांकास विहीत वेळेत उपस्थित राहावे असे आवाहन श्री. यादव यांनी केले आहे.

## २२-बुलढाणा विधानसभा मतदारसंघात सहा मतदान केंद्राची वाढ; आता ३३७ मतदान केंद्र

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणूकीत मतदारांना मतदान करणे सोईचे व्हावे, यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारसंघात मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार २२- बुलढाणा विधानसभा मतदारसंघात सहा नवीन मतदार केंद्राची निर्मिती करण्यात आली असून आता बुलढाणा मतदारसंघात ३३७ मतदान केंद्र झाले आहेत.

मतदान केंद्राच्या रचनेत सुसूत्रता आणण्यासाठी ज्या मतदान केंद्रांवर मर्यादेपेक्षा जास्त मतदार आहेत किंवा दोन गावातील मतदार एकाच मतदान केंद्रांना जोडण्यात आलेले होते, असे सर्व मतदान केंद्र मिळून जिल्ह्यात नव्याने २३ मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये मोताळा, रामगाव, नेहरुनगर, गोधनखेड, हवनखेड व अफजलपूरवाडी येथे मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे बुलढाणा विधानसभा मतदारसंघात ३३७ मतदान केंद्र झाले असून शहरी भागात ७९ तर ग्रामिण भागात २५८ मतदान केंद्र आहेत. नवीन मतदान केंद्राच्या निर्मितीमुळे कुटुंबातील सर्व मतदारांची नावे एकाच मतदान केंद्रावर उपलब्ध होणार आहेत.

लोकसभेला जिल्ह्यात २ हजार २६५ व एक सहायकारी मतदान केंद्र असे एकूण २२६६ मतदान केंद्रे होती. यात २३ नवीन मतदान केंद्रांची वाढ होऊन २ हजार २८८ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. दि. १ जुलै २०२४ अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्र सुसूत्रीकरणांतर्गत मतदान केंद्रात वाढ करण्यात आली आहे.

**मतदारसंघात सहा नवीन मतदार केंद्राची वाढ**

१) ७४-मोताळा केंद्रावर १४०० पेक्षा जास्त मतदार झाल्यामुळे ७५-मोताळा जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा खोली क्र. ३ मतदान केंद्र तयार करण्यात आले.

२) रामगांव गावातील मतदारांना मतदाना करिता १०८-निमखेड जिल्हा परिषद प्रायमरी शाळा येथे दोन कि. मि.पेक्षा जास्त अंतर यावे लागत असल्याने जिल्हा परिषद प्रायमरी शाळा रामगांव येथे मतदान केंद्र तयार करण्यात आले.

३) नेहरुनगर गावातील मतदारांना मतदाना करिता १३५-वारुळी येथे दोन कि.मि. पेक्षा जास्त अंतर यावे लागत असल्याने १३६-नेहरुनगर जिल्हा परिषद प्रायमरी शाळा येथे नविन मतदान केंद्र तयार करण्यात आले.

४) गोंधनखेड गावातील मतदारांना मतदानाकरिता २३२-गिरडा येथे दोन कि.मि. पेक्षा जास्त अंतर यावे लागत असल्याने २३३-गोंधनखेड जिल्हा परिषद मराठी प्रायमरी शाळा येथे नविन मतदान केंद्र तयार करण्यात आले.

५) हनवतखेड गावातील मतदारांना मतदानाकरिता २४७-सावळा येथे दोन कि.मि. पेक्षा जास्त अंतर यावे लागत असल्याने २४८-हनवतखेड जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा येथे नविन मतदान केंद्र तयार करण्यात आले.

६) अफजलपुरवाडी गावातील मतदारांना मतदानाकरिता २९१-दत्तपुर येथे दोन कि.मि. पेक्षा जास्त अंतर यावे लागत असल्याने २९२-अफजलपूरवाडी जिल्हा परिषद मराठी प्रायमरी शाळा येथे नविन मतदान केंद्र तयार करण्यात आले.

**प्रथमच मतदानाचा हक्क बजावणार ६ हजार १९० नवमतदार**

२२-बुलढाणा मतदारसंघात ३ लक्ष ०६ हजार ०४६ मतदार असून त्यामध्ये १ लक्ष ५८ हजार ९६९ पुरुष तर १ लक्ष ४७ हजार ६१ महिला व १६ तृतीयपंथी मतदार आहेत. ८५पेक्षा जास्त वयोमान असलेले मतदार ४ हजार ७८४ असून १ हजार ८५२ पुरुष तर २ हजार ९३२ महिला मतदार आहेत. तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये प्रथमच मतदानाचा हक्क बजावणारे ६ हजार १९० नवमतदार असून ४ हजार ०३३ पुरुष तर २ हजार १५६ महिला व एक तृतीयपंथी नवमतदार आहेत.

### मतदान यादीत नाव असल्याची मतदारांनी खात्री करावी- जिल्हाधिकारी



भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार दि. २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सर्व मतदारांनी मतदानाच्या दिवशी मतदान करावे. यासाठी मतदारांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करुन घ्यावी. मतदार केंद्र जाणून घेण्यासाठी व्होटर हेल्पलाईन ॲप किंवा voters.eci.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा. तसेच मतदार नोंदणी किंवा मतदान केंद्राची माहिती शोधण्याच्या बाबतीत काही मदत हवी असल्यास १९५० या टोल फ्री क्रमांक किंवा बुलढाणा मतदारसंघासाठी हेल्प लाईन क्रमांक १८००२३३६३६२ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.


संस्थेच्या सर्व ठेवीदार भाग धारक व हितचितकांना
दीपावली व भाऊबीज
निमित्त आपणास व आपल्या परिवारास हार्दिक शुभेच्छा..
श्रीराम अर्बन को.ऑप. क्रेडीट सोसायटी
र.नं.५०९ डोणगांव ता. मेहकर जि. बुलडाणा
फोन नं. : 7083859665
आमच्या विविध कर्ज योजनांचा आवश्य लाभ घ्या...
ठेवीचे व्याज दर
11 ते 10 दिवस 7%
91 ते 180 दिवस 8%
181 से 365 दिवस: 9%
366 ते 3 वर्षाकरीता 10%
3 वर्ष ते अधिक 11%
त्वरीत कर्ज उपलब्ध
››यशश्री ठेव योजना ८४ महिण्यात दामदुप्पट
››यधनश्री ठेव योजना १२१ महिन्यात दामतिप्पट
दिपक पाटील आखाडे (अध्यक्ष)
मो.9511177222, 9423144333
पतसंस्थेचे वैशिष्टे-
* संपुर्ण संगणीकृत शाखा ग्राहकांना तत्पर सेवा तात्काळ कर्जाची व्यवस्था
* जेष्ठ नागरीक अपंग, विधवा महिला, माजी सैनिक यांना (ठेवीवर) अर्धा टक्के जास्त.
* १० हजार ते ५० हजार प्रत्येकी महिला बचत गट कर्ज उपलब्ध.
* ३० हजार ५० हजार व १ लाख पर्यंत विनातारण व बिगर मॉर्गेज दैनिक परतफेड कर्ज
मालमत्ता तारण कर्ज 14%
महिला बचतगट कर्ज
वेळ सकाळी 9 ते 6 वा. पैसे देणे घेणे व्यवहार
पानपट्टी, चहा, स्टॉल, किराणा दुकान, जनरल स्टोअर्स इ. लहान व्यवसायीकांना रूपये 30000 तात्काळ मिनी दैनंदिन कर्ज...
वाहन तारण कर्ज
व्याजदर १४ %
सोने तारण कर्ज
व्याजदर १२ %
ठेवीचे प्रकार-››बचत ठेव ››मुदत ठेव
››दैनिक अल्पवचन देख (दैनिक प्रतिनिधीची घरपोच सेवा)
››महिण्यावारी (बाबा) ठेव
PRARAMBH ADV | 8177818927


मागील 25 वर्षांपासून आपल्या सेवेत असलेले विश्वासू श्रीराम हार्डवेअर..
दीपावली व भाऊबीज
निमित्त आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा..
श्रीराम हार्डवेअर
नरेंद्र शेषराव आखाडे
मो. 9511166222
राजुरी स्टील, अंबुजा सिमेंट बिर्ला सिमेंट. व नवीन घरासाठी लागणारे सर्वच सामान अगदी माफक दरात उपलब्ध..
पत्ता -नरसिंह नगर मेहकर रोड,डोणगाव


दीपावली व भाऊबीज
निमित्त आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा..
सुरज दिनोरे
शिवसेना शहर प्रमुख डोणगाव


दीपावली व भाऊबीज
निमित्त आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा..
संजय पळसकर
अध्यक्ष -शंकर सहकार जिनींग,डोणगाव


दीपावली व भाऊबीज
निमित्त आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा..
ममता फर्निचर मार्ट
सोफा, पलंग, विंडो, स्लायडींग, दरवाजे, चौकटी तयार करून मिळेल तसेच सागवान कामे करून मिळेल
हकीम खाँ पठाण मो. 9850827374
पत्ता-मेन रोड, डोणगांव


दीपावली व भाऊबीज
निमित्त आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा..
प्रा.गजानन सातपुते
सदस्य-संजिवनी परिवार


दीपावली व भाऊबीज
निमित्त आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा..
विनायकराव टाले
जेष्ठ नेते भा. रा. कॉं.


दीपावली व भाऊबीज
निमित्त आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा..
निंबाजी पांडव
मा.सभापती पं.स.मेहकर


Kubota
Escorts Kubota Limited
एक दिवा असुद्या अंगणात जिथे उजेड काही केल्या जाणार नाही,
एक दिवा अशा ठिकाणी जिथे दिवाळी अजुन माहिती नाही.
FARMTRAC
दिवाळी व भाऊबीज
निमित्त सर्व जनतेस...
हार्दिक शुभेच्छा!
अधिकृत विक्रेता
शिवशक्ती ट्रॅक्टर्स
जानेफळ रोड, मेहकर
मो.9822181777
श्री.भास्करराव गारोळे
श्री.किशोर भास्करराव गारोळे


दीपावली व भाऊबीज
निमित्त आपणास व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा..
विश्वलक्ष्मी मोटर्स
Sales/Service/Spare
अभिषेक प्रदीप पळसकर
पत्ता: मेहकर मालेगाव रोड,डोणगाव
PRARAMBH ADV | 8177818927